<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक-संकिर्ण-२०२०/प्र. क्र.१२५/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २२.०५.२०२०

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय:**- कोव्हिड-१९ साथीच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने पुढील उपाययोजना सुचविण्यासाठी कार्यबल गट (Task Force) गठीत करण्याबाबत ....

महोदय,

कोव्हिड-१९ साथीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यापीठे/ महाविद्यालयांमध्ये परीक्षांचे नियोजन आणि पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या तसेच शाळांच्या पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या अंमलबजावणीत अडचणी उद्भवल्यास त्यावर उपाययोजना सुचविण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१२५/विशि-३, दिनांक १५/०५/२०२० तसेच शासन शुद्धीपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१२५/विशि-३, दिनांक १९/०५/२०२० च्या अन्वये कार्यबल गट (Task Force) गठीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय तसेच शासन शुद्धीपत्रकाची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

(सतिश तिडके)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव सादर :-
१.मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२.मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३.मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४.मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५.मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६.मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

७.मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. उप सचिव यांचे स्वीय सहाय्यक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
११. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई
१२. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. श्री.दिनकर पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१४. निवडनस्ती (विशि-३).

७५

कोव्हिड-१९ साथीच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण तसेच शालेय शिक्षणाबाबत पुढील उपाययोजना सुचविण्यासाठी कार्यबल गट (Task Force) गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१२५/विशि-३,
मंत्रालय, विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १५ मे, २०२०.

प्रस्तावनाः-

राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथीरोग प्रतिबंधक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू केला असून, त्यान्वये संचारावर दि.१७ मे, २०२० पर्यंत निर्बंध घातलेले आहेत. कोव्हीड-१९ चे संकट सर्व समाज आणि राज्य यांना आव्हान आहे. कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत झाले असून, त्याचा थेट परिणाम अनेक घटकांवर झाल्याचे दिसून येते. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या दैनंदिन कार्यपध्दतीवरही याचे गंभीर परिणाम झाले आहेत. दि. १४/०३/२०२० पासून शैक्षणिक संस्था बंद झाल्या असून, नियमित परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले आहे.

२. कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे आणि त्याअनुषंगाने केंद्र व राज्य शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांच्या अनुषंगाने मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी राज्यातील सर्व अकृषी, तंत्रज्ञान आणि मुक्त विद्यापीठांचे कुलगुरु तसेच सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संचालक, उच्च शिक्षण, पुणे आणि संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्या सोबत दि. ०६/०४/२०२० रोजी व्हीडीओ कॉन्फरंसीगद्वारे बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत विद्यापीठांचे शैक्षणिक सत्र २०१९-२० आणि २०२०-२१ साठीची वेळापत्रके आणि सत्र परीक्षांची फेर रचना व निकाल जाहिर करणे या संदर्भात चर्चा करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देशानुसार विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे शैक्षणिक सत्र व परीक्षांकरिता एक सामाईक योजना तयार करण्याकरिता चार विद्यापीठांचे कुलगुरु, संचालक, उच्च शिक्षण, पुणे आणि संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांची एक राज्यस्तरीय समिती गठित करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले

होते. सदर राज्यस्तरीय समितीची दि.१४ एप्रिल, २०२० रोजी ऑनलाईन बैठक झाली. सदर बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने गठीत केलेल्या समितीचा अहवाल मिळाल्यावर अंतिम निर्णय घेण्याचे प्राथमिक चर्चेद्वारे ठरविण्यात आले होते.

३. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) ही उच्च शिक्षणाबाबत सर्वोच्च संस्था असून तिने दिलेल्या निर्देशांचे देशातील सर्व विद्यापीठांकडून पालन करण्यात येते. विद्यापीठ अनुदान आयोगाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कोव्हिड-१९ साथीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत परीक्षा आणि शैक्षणिक सत्र यासंदर्भात मार्गदर्शक सूचना दि.२९ एप्रिल, २०२० रोजी निर्गमित केल्या आहेत. राज्यस्तरीय समितीची दुसरी बैठक दिनांक १ मे, २०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांवर चर्चा केल्यानंतर समितीने उच्च शिक्षणाशी संबंधित भागधारकांचे मत घेऊन निर्णय घेण्याचे ठरले. त्यानुसार राज्यस्तरीय समितीच्या सदस्यांनी उच्च शिक्षणाशी संबंधित भागधारकांशी तसेच इतर कुलगुरुंशी ऑनलाईन चर्चा केल्या. समितीला व्यवस्थापन क्षेत्रातील विविध संस्था, प्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून लिखित स्वरुपात अनेक सूचना प्राप्त झाल्या. तदनंतर, समितीने तीन बैठका अनुक्रमे दिनांक ३ मे, २०२०, ४ मे, २०२० आणि ६ मे, २०२० रोजी घेऊन आपल्या शिफारशी शासनास दिनांक ६ मे, २०२० रोजी सादर केल्या आहेत. सदर शिफारशी राज्य शासनाने स्विकारल्या आहेत. त्यातील ठळक शिफारशी आणि परीक्षा व नवीन शैक्षणिक वर्ष याबाबतचे प्रस्तावित वेळापत्रक खालील प्रमाणे आहेः-

(१) विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा दि. ०१ जुलै, २०२० ते दि. ३१ जुलै, २०२० दरम्यान सामाजिक अंतर पाळले जाईल, याची काळजी घेऊन आयोजित करण्यात येणार आहेत.

(२) प्रथम वर्ष पदविका, पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे नवीन शैक्षणीक वर्ष दि. १ सप्टेंबर, २०२० रोजी व इतर सर्व वर्षांच्या अभ्यासक्रमांचे नवीन शैक्षणीक वर्ष दि. १ ऑगस्ट, २०२० रोजी सुरु करण्यात येणार आहे.

(३) पदविका, पदवीपुर्व आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांना मिळणारी ग्रेड हि ५०% अंतर्गत मूल्यमापनावावर आधारित आणि ५०% पूर्वीच्या सत्रातील गुण ( उपलब्ध असल्यास) ठरवावी.

(४) सर्व अंतिम वर्षाच्या (पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर ) परीक्षा सर्व विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आयोजित कराव्यात.

४. 'कोव्हिड-१९' मुळे सध्या केवळ देशातच नव्हे तर संपूर्ण जगात अभूतपूर्व अशी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली असून साधारणतः मार्च २०२० च्या सुरुवातीपासून विविध शासकीय यंत्रणा, खाजगी आस्थापना, सामाजिक संघटना, वित्तीय क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र यांनी या विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रसार रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, मार्गदर्शकाच्या तत्वानुसार आपल्या कामकाजात योग्य ते बदल केले आहेत. शैक्षणिक संस्था या

'आवश्यक सेवा' प्रवर्गात मोडत नाहीत. त्यामुळे सर्व शैक्षणिक संस्था किंबहुना समग्र शैक्षणिक क्षेत्र (सेक्टर) 'वर्क फ्रॉम होम' या कार्यशैलीनुसार कार्यरत आहे. या अनुषंगाने विविध उच्च, तंत्र शिक्षण व शालेय शिक्षण संस्था यांनी अवलंब केलेल्या उपाययोजनांचा गोषवारा खालीलप्रमाणे आहेः-

(१) दि.१६ मार्च २०२० रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्रातील निर्देशानुसार सर्व तंत्रशिक्षण संस्थांमधील कामकाज 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीने पूर्ण करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच हे कामकाज कश्या पद्धतीने करता येईल याबाबत व्हॉट्सॲप समूहावर सचिव (उ.व तं.शि.) आणि संचालक, तंत्रशिक्षण यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि आढावा घेतला. या अनुषंगाने, शिक्षकांनी ऑनलाईन अभ्यासक्रमास (SWAYAM, COURSERA etc) प्रवेश घेणे व तो ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यासक्रमांची माहिती पुरविणे , त्यांना विषय निहाय / टॉपिक निहाय विडिओ इमेल / Whatspp द्वारे उपलब्ध करून देणे, ऑनलाइन संसाधनांचा (SWAYAM, NEAT, COURSERA, edX etc) अध्ययनासाठी स्वतः शिक्षकांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी वापर करणे, Screen-o-matic सारख्या ऑनलाईन व्हिडीओ एडिटिंग प्रणालीचा वापर करून शिक्षकांनी स्वतः विषय निहाय व्हिडीओ क्लीप तयार करून विद्यार्थ्यांना पुरविणे , व्हॉट्सॲप समूहाद्वारे Assignment देणे, पुढील सत्राचे शैक्षणिक नियोजन विभागास सादर करणे, क्वेश्चन बँक तयार करणे, व्हॉट्सॲप समूहाद्वारे शंका निरसन, इत्यादी अनेक पर्याय सुचविण्यात आलेत. "वर्क फ्रॉम होम"चे निर्देश निर्गमित होईपर्यंत तंत्रशिक्षण संस्थांमध्ये साधारणतः ८० % सिलॅबस प्रत्यक्ष वर्गामधील सत्रात शिकवून पूर्ण झाला होता. "वर्क फ्रॉम होम"च्या काळात तंत्रनिकेतन संस्था व अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील शिक्षक वर्गाने वरील पर्यायांचा वापर केल्याने अजून ९-१० % अभ्यासक्रम पूर्ण करण्यास मदत झाली. मात्र सदर ऑनलाईन अध्यापन व अध्ययन प्रक्रियांचा आढावा घेणे देखील आवश्यक असल्याने संस्थांचा आढावा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे तंत्रशिक्षण संचालनालयाने निश्चित केले होते. यासाठी एक वेब आधारित ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली. सर्व सहभागी शासकीय संस्था मधील अधिव्याख्याते, विभाग प्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, संस्थाप्रमुख यांना सदर प्रणालीमध्ये नोंदणी करण्याच्या व माहिती भरण्याच्या सूचना देण्यात आल्यात. या माहितीच्या आधारे संस्था व शिक्षक यांनी वर्क फ्रॉम होम करताना वरीलपैकी कोणकोणते ऑनलाईन अध्यापन व अध्ययनाचे पर्याय वापरले, त्यांची परिणामकारकता काय, किती विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला, इत्यादी बाबी तपासण्यात येणार आहेत. त्यासाठी सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक आणि संबंधित संस्थेचे प्राचार्य यांना जबाबदारी दिली आहे. अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांमधील शिक्षकीय पदांना ७ वा वेतन आयोग लागू करताना शासनाने शिक्षकाची कामगिरी तपासण्यासाठी ३६० डिग्री फीडबॅक संकल्पना अनिवार्य केली आहे. या अनुषंगाने शिक्षक वर्गाचे वार्षिक गोपनीय अहवाल, आणि '३६० डिग्री फीडबॅक' या बाबींचे मूल्यमापन करताना त्यांनी 'वर्क फ्रॉम होम' अंतर्गत केलेल्या कामाचे मूल्यमापन समाविष्ट असेल. अशा पद्धतीने आधुनिक

तंत्रावर आधारित अध्यापन पद्धतींचा वापर करून या अनिवार्य लॉक डाउन कालावधीत विद्यार्थ्यांचे कमीत कमी शैक्षणिक नुकसान होईल यासाठी उपाययोजना करण्यात आली.

(२) तसेच विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये देखील सचिव (उ.व तंशि.) आणि संचालक, उच्च शिक्षण यांचे समवेत झालेल्या विविध व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकांदरम्यान दिलेल्या निर्देशानुसार ऑनलाईन अध्यापन पद्धतीचा वापर करून अभ्यासक्रम शिकविण्यात आला.

(३) सद्य परिस्थितीत, राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमधील अध्यापक वर्ग NPTEL, SWAYAM सारख्या किंवा टाटा समूहाने अत्यंत अल्प शुल्कात उपलब्ध करून दिलेल्या किंवा कोर्सेरा सारख्या ऑनलाईन प्रणालीवर अध्ययन करीत आहेत. तसेच शैक्षणिक कामकाजासाठी Zoom सारख्या माध्यमातून बैठक घेऊन कामकाज पूर्ण केले जात आहे. Google Forms च्या माध्यमातून सराव परीक्षा घेतल्या जात आहेत. संचालक तंत्रशिक्षण यांनी वेबिनार च्या माध्यमातून राज्यातील प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी, प्राचार्य व शिक्षक वर्ग यांना Post-COVID १९ परिस्थितीला कसे सामोरे जाता येईल याबाबत जवळपास २००० श्रोत्यांना मार्गदर्शन केले. कोविड पश्चात परिस्थितीशी कसे जुळवून घेता येईल याबाबत विद्यार्थी, शिक्षकवर्ग, प्रशासकीय अधिकारी, संस्थाप्रमुख, पालक यांना sensitize करण्याचा प्रयत्न विभागातर्फे केला जात आहे. संस्थांमधील अनुभवी शिक्षक वर्ग औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तींसाठी तांत्रिक व्याख्याने ऑनलाईन पद्धतीने देत आहेत.

५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे कोरोनाच्या कालावधीत शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खालील प्रयत्न करण्यात आले आहेतः-

१. इ. १ ली ते इ.१२ वी ची सर्व पाठ्यपुस्तके बालभारतीच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

२. राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक यांच्यासाठी सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या ई साहित्य, ई संसाधने, विविध स्व शिक्षणाचे मार्ग याविषयी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

३. राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत Alternative Academic Calendar विकसित करण्यात आले आहे.

४. राज्यातील इ.१ ली ते इ.१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी शाळा बंद .. पण शिक्षण आहे या नावाने अभ्यासमाला सुरु करण्यात आली आहे. यामध्ये राज्य शासन व केंद्र सरकार यांच्या स्वतःच्या दीक्षा app द्वारे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दैनंदिन अभ्यास व विविध कृती दिल्या जात आहेत. याचा वापर करून राज्यातील शाळांमधील विद्यार्थी घरी बसून संबंधित इयत्तांचा व विषयांचा अभ्यास करत आहेत.

५. राज्यातील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांना दररोज एक पुस्तक वाचण्यास पाठविले जात आहे.

६. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत राज्यातील शालेय शिक्षण विभागातील ५००० केंद्रप्रमुख यांच्यासाठी ऑनलाईन पद्धतीने वेबिनारद्वारे केंद्रप्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यातून राज्यात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी यंत्रणेतील सर्वांना बरोबर घेऊन एकवाक्यतेने प्रयत्न केले जात आहेत.

७. या कालावधीत विद्यार्थ्यांना समुपदेशक शिक्षकांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातून ४०३ समुपदेशक शिक्षकांच्या जिल्हानिहाय सेवा विद्यार्थी, पालक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

८. प्रथम संस्थेच्या सहकार्याने मिस कॉल द्या व गोष्ट ऐका या उपक्रमाद्वारे राज्यातील विद्यार्थ्यांना गोष्टी ऐकवल्या जात आहेत.

९. शाळेबाहेरची शाळा या अंतर्गत प्रायोगिक स्तरावर रेडीओ वर प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी सकाळी १०.३५ वाजता विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

१०. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत राज्यातील शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच स्थापन करण्यात आला आहे. याअंतर्गत विभागातील अधिकाऱ्यांचे विविध शैक्षणिक विषय, व्यक्तिमत्व विकास , शालेय पाहणी, यावर चर्चासत्रे आयोजित केली जात आहेत.

११. याचसोबत लवकरच DTH वाहिनीवर दररोज २.०० तास इ .१ ली ते इ. १० वी च्या शैक्षणिक ई साहित्याचे प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

६. कोव्हीड-१९ मुळे उद्भवलेली गंभीर परीस्थिती कशा पध्दतीने बदलेल याचे चित्र अजून स्पष्ट झालेले नाही. कोव्हीड-१९ साथीचा प्रसार आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा प्रभाव व त्याची व्याप्ती राज्याच्या वेगवेगळया प्रदेशांमध्ये भिन्न स्वरुपात दिसून येत आहे. विद्यापीठे/महाविद्यालयांमध्ये परीक्षांचे नियोजन आणि पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या तसेच शाळांच्या पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या अंमलबजावणीत अडचणी उद्भवल्यास त्यावर उपाययोजना सुचविण्याकरीता एक कार्यबल गट (Task Force) गठीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-** कोव्हिड-१९ साथीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यापीठे/महाविद्यालयांमध्ये परीक्षांचे नियोजन आणि पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या तसेच शाळांच्या पुढील शैक्षणिक वेळापत्रकांच्या अंमलबजावणीत अडचणी उद्भवल्यास त्यावर उपाययोजना सुचविण्याकरीता खालील प्रमाणे कार्यबल गटाची (Task Force) स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
| --- | --- | --- |
| १. | अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | अध्यक्ष |
| २. | सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ३. | कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | सदस्य |
| ४. | संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई | सदस्य |
| ५. | आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | सदस्य |
| ६. | श्री.दिनकर पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | सदस्य-सचिव |

समितीची कार्यकक्षा:- कार्यबल गट कोव्हीड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होऊ देता, शिक्षणाची प्रक्रिया सुरळीतपणे सुरु राहण्याकरिता अल्पकालीन तसेच कायमस्वरुपी उपाययोजना राबवून एकात्म धोरण ठरविणे व त्याअनुषंगाने शासनाची मान्यता प्राप्त करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००५१५१३३८५२७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सतिश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

९. उप सचिव यांचे स्वीय सहाय्यक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. उप सचिव यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.

११. संचालक, उच्च शिक्षण, पुणे

१२. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई

१३. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

१४. श्री.दिनकर पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

१५. निवडनस्ती (विशि-३).

ey

कोव्हिड-१९ साथीच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण तसेच शालेय शिक्षणाबाबत पुढील उपायोजना सुचविण्यासाठी कार्यबल गट (Task Force) गठीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२५/विशि-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- १९ मे, २०२०

संदर्भ:- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२५/विशि-३, दि.१५ मे, २०२०

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये कोव्हिड-१९ साथीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण तसेच शालेय शिक्षणबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी कार्यबल गट (Task Force) गठीत करण्यात आलेला आहे. सदरहू शासन निर्णयात दर्शविलेल्या तक्त्यामधील अनुक्रमांक-५ येथील अधिकाऱ्याचे नाव या रकान्यामध्ये नमूद "आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" **याऐवजी** "आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सतिश तिडके)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,
९. उपसचिव, यांचे स्वीय सहायक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. उपसचिव, यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१३. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४. श्री. दिनकर पाटील संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
१५. निवड नस्ती (विशि-३)